**सरकार –वि– संजय पेका पदा**

| | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | २९/०४/२०२४ |
| | नोंदणी दिनांक | : | २९/०४/२०२४ |
| | निकाल दिनांक | : | ०२/०४/२०२६ |
| | कालावधी | : | व. म. दि.<br>०१ ११ ०४ |

CNR NO.MHGA13-000149-2024. **निशाणी क्र. २४**

**नमुना क्र. XXXII**
**भाग 'अ'**
**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**
**[फौजदारी नियमावली प्रकरण VIपरिच्छेद 44(i)]**

| | | |
|---|---|---|
| **लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२ नुसार असलेल्या अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अहेरी, जिल्हा गडचिरोली येथील विशेष न्यायालयात पीठासीन अधिकारी :– रोहन बा. रेहपाडे,** | | |
| | न्यायनिर्णयाची तारीख :– ०२/०४/२०२६<br>**विशेष (पोक्सो) खटला क्र. २२/२०२४** | |
| | प्रथम खबर/गुन्हा क्र. ०१/२०२४<br>नारगुंडा पोलीस स्टेशन | |
| फिर्यादी/<br>अभियोग पक्ष | | **महाराष्ट्र सरकार**<br>तर्फे नारगुंडा पोलीस स्टेशन |
| प्रतिनिधीत्व करणार | | सरकारी अभियोक्ता श्री. एस.डी. गावडे |
| आरोपी | | **संजय पेका पदा** |

| | | |
|---|---|---|
| | | वय – २२ वर्षे,<br>व्यवसाय – मजुरी,<br>रा. झारेवाडा, तालुका – एटापल्ली,<br>जिल्हा – गडचिरोली. |
| प्रतिनिधीत्व करणार | | विधीज्ञ श्री. बी. एम. आत्राम |

**भाग 'ब'**

**[फौजदारी नियमावली प्रकरण VI परिच्छेद 44(ii )]**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २५/१२/२०२३ ते ३०/१२/२०२३ |
| प्रथम खबर तारीख | २९/०२/२०२४ |
| आरोपपत्र दाखल केल्याची तारीख | २९/०४/२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | १५/०६/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख. | १२/०३/२०२६ |
| ज्या दिवशी न्यायनिर्णय राखून ठेवला आहे, ती तारीख | ३०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२/०४/२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास शिक्षेची तारीख | लागू नाही. |

## आरोपीची माहिती

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हे दाखल | निर्दोष ठरविले की दोषी ठरविले | ठोठाविलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | संजय पेका पदा | ०५/०३/२०२४ | २३/०४/२०२४ | भारतीय दंड संहीतेचे कलम ३७६, ३७६(२)(जे)(एन)बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियमाचे कलम ४ व ६ अन्वये. | निर्दोष. | लागू नाही. | लागू नाही. |

**भाग 'ब'**

**[फौजदारी नियमावली प्रकरण VIपरिच्छेद 44(iii)]**

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी**

**अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
| PW-1 | पिडीता<br>(निशाणी क्र. P-20) | पिडीता साक्षीदार |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | कोणी नाही. | -- |

**क. न्यायालयाचे साक्षीदार, असल्यास :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | कोणी नाही. | -- |

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाची निशाणी क्रमांकाची यादी**

**अ. अभियोग पक्षातर्फे निशाणी क्रमांक :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | Exhibit No.21 | गुन्हयाचे तपशीलाचा नमुना/घटनास्थळ पंचनामा (बचाव पक्षाने मान्य केला) |

### ब. बचाव पक्षातर्फे निशाणी क्रमांक :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| | -- | -- |

### क. न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| | -- | -- |

### ड. भौतिक वस्तू (Material Objects)

| अ.क्र. | भौतिक वस्तू क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | -- | -- |

## न्यायनिर्णय

(दिनांक २ एप्रिल, २०२६ रोजी पारित)

१. आरोपी संजय पेका पदा हा भारतीय दंड संहीतेचे कलम ३७६, ३७६(२)(एन), ३७६(३) आणि बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियमाचे कलम ४ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपावरुन संपरिक्षेचा सामना करीत आहे.

२. अभियोग पक्षाचे असे कथन आहे की, पिडीता व आरोपीची शाळेत चांगल्या प्रकारे ओळख झाली. त्यांची शाळेत असतांना अधुन-मधुन भेट होत असे. त्या भेटीचे रूपांतर मैत्रीत होवुन प्रेम संबंध

निर्माण झाले व दोघांनी लग्न करण्याचे ठरविले. प्रेमसंबध जुळाल्यापासुन आरोपी याने अल्पवयीन पिडीतेला लग्न करण्याचे वचन देवुन शारीरीक संबध करण्याची वारंवार मागणी करू लागला परंतु अल्पवयीन पिडीतेने त्यास नकार दिला. डिसेंबरमध्ये दुपारी ३.३० वाजताचे दरम्यान आरोपी याने अल्पवयीन पिडीतेला कन्ना चंदु हेडो यांचे घरी भेटण्यासाठी बोलाविले व कन्ना चुंडु हेडो यांचे घरचे सर्व कामात व्यस्त असल्याचे पाहुन आरोपीने खोलीचा दरवाजा बंद करून आरोपीने पिडीतेला 'मी तुझ्यावर खुप प्रेम करतो, मला तुझ्यासोबत लग्न करायचे आहे, मी तुला कधीच धोका देणार नाही' असे लग्नाचे आमीष देवुन अल्पवयीन पिडीतासोबत शारीरीक संबंध प्रस्थापीत केले. परत त्याच ठिकाणी आरोपीने पिडीतेला बोलावुन लगट करीत असतांना पिडीतेने त्याला मी अजुन लहान आहे असे काही करायला नको, लग्न झाल्यानंतर करू अशी विनंती केली तरी देखील आरोपीने त्या रात्री पिडीतेसोबत शारीरीक संबंध प्रस्थापीत करून पिडीतेस गर्भवती केले.

३. पिडीतेच्या बयाणा आधारे पहिली खबर दाखल केली. गुन्हा क्र.०१/२०२४ ची नोंद नारगुंडा पोलीस स्टेशनला भारतीय दंड संहीतेचे कलम ३७६, ३७६(२)(जे)(एन), ३७६(३) आणि बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियमाचे कलम ४ व ६ नुसार दाखल करण्यात आला. तपासी अधिकारी यांनी घटनास्थळास भेट दिली आणि घटनास्थळ पंचनामा तयार केला. पिडीतेची वैद्यकीय तपासणी करण्यात

आली. आरोपीला अटक करण्यात आली. त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. पिडीतेचे आणि आरोपीचे जैविक नमुने घेण्यात आले. पिडीतेचे आणि आरोपीचे जैविक नमुने न्याय वैज्ञानीक प्रयोगशाळा, नागपुर येथे पाठविण्यात आले. साक्षीदारांचे बयाण नोंदविले. आरोपीविरूध्द भरपुर पुरावा आढळुन आल्याने त्याच्याविरुद्ध गुन्ह्याचा तपास पूर्ण झाल्यानंतर भारतीय दंड संहीतेचे कलम ३७६, ३७६(२)(जे)(एन), ३७६(३) आणि बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियमाचे कलम ४ व ६ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपावरुन दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. माझे सुविद्य पुर्वाधिकारी यांनी निशाणी क्र.१४ येथे आरोपी संजय पेकु पदा विरुद्ध दोषारोप निश्चित केले. सदरचा दोषारोप आरोपीला त्याचे भाषेत वाचून व समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा नाकबूल केला व खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

५. आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्याकरिता अभियोग पक्षाने केवळ एका साक्षीदारास तपासले व त्यानंतर नि.क्र.२२ येथे पुरसिस देवून पुरावा बंद केला. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये स्पष्टीकरणासाठी आरोपीला विचारण्यात आलेल्या प्रश्नांना आरोपीने दिलेले उत्तर यावरुन आरोपीचा बचाव पूर्णपणे आरोप नाकारल्याचा आहे.

६. अभिलेख पडताळले. अभियोग पक्षातर्फे विद्वान अतिरिक्त सरकारी

अभियोक्ता श्री. एस.डी. गावडे आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी.एम. आत्राम यांचा युक्तीवाद ऐकला.

७. खटल्यातील तथ्य पाहता, माझ्यापुढे खालील मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष मी खालील कारणांच्या आधारे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २५/१२/२०२३ ते ३०/१२/२०२३ दरम्यान मौजा नारगुंडा, ता.भामरागड, जि. गडचिरोली येथे आरोपी संजय याने पिडीतेवर बलात्कार केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| २. | दिनांक २५/१२/२०२३ ते ३०/१२/२०२३ दरम्यान आरोपी संजय याने पिडीता ही १६ वर्षापेक्षा कमी वयाची आहे हे माहित असतांना सुध्दा वारंवार बलात्कार केला, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? | नाही. |
| ३. | दिनांक २५/१२/२०२३ ते ३०/१२/२०२३ दरम्यान आरोपी संजय याने ती अल्पवयीन आहे हे माहित असुनसुध्दा तिचेशी वेळोवेळी बळजबरीने शारीरीक संबंध | |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | प्रस्तापीत केले व लैंगीक अत्याचार केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| ४. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबत :-**

८. आरोपीच्या वकीलांनी गुन्हयाच्या तपशीलाचा नमुना/घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.२१) मान्य केला. त्यामुळे घटनास्थळाबाबत आरोपीला कोणताही वाद नाही.

९. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ पिडीता हिला तपासण्यात आले. साक्षीदार क्र. १ पिडीता हिने तिच्या सरतपासात कथन केले की, ती, तिची आई, बहिन, भाऊ आणि वहिनी यांच्यासोबत कुचेर, ता. भामरागड, जि. गडचिरोली येथे राहते. घटना तीन वर्षापुर्वी तिच्या घरी घडली. तिला आरोपीसोबत लग्न करायचे होते. तिने रागाच्या भरात फिर्याद दिली. तिने फिर्यादीपक्षाला मदत केलेली नाही म्हणून सहाय्यक सरकारी वकिलांनी

तिची उलटतपासणी घेतली. त्यामध्ये तिने आपल्या बयानातील अधोरेखीत भाग अ नाकारला. पिडीतेने हे नाकारले की, डिसेंबर २०२४ मध्ये आरोपीला भेटण्यासाठी ती कन्ना हेडो यांच्या घरी गेली होती. तसेच पिडीतेने ही बाब सुध्दा नाकारली की, आरोपी तिच्यावर प्रेम करतो आणि लग्न करायचे आहे या कारणावरून आरोपीने तिच्यासोबत शारीरीक संबंध ठेवले.

१०. पिडीता साक्षीदार क्र.१ ही अभियोग पक्षाला मदत करीत नाहीत. याशिवाय पिडीता ही अल्पवयीन आहे हे माहित असतांना असतांना आरोपीने तिच्यासोबत शारीरीक संबंध ठेवला व तिच्यावर वारंवार बलात्कार करून लैंगीक अत्याचार केला असल्याबाबतचा कुठलाही पुरावा अभियोग पक्षाने सादर केला नाही. फक्त घटनास्थळ सिध्द केल्यामुळे आरोपीला दोषी ठरविणे योग्य होणार नाही.

११. वरील परिच्छेदांमध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहीतेचे कलम ३७६, ३७६(२)(जे)(एन), ३७६(३) आणि बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियमाचे कलम ४ अन्वये दोषारोप सिद्ध होण्यासाठी कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपीची निर्दोष मुक्तता होण्यास तो पात्र ठरतो. म्हणून मी मुद्दे क्र. १ व ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे आणि मुद्दा क्र. ४ चे उत्तराकरिता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) आरोपी **संजय पेका पदा** याची नारगुंडा पोलीस स्टेशन येथे नोंदविलेला गुन्हा क्र. १/२०२४ वरुन दाखल झालेल्या प्रस्तुत खटल्यातून भारतीय दंड संहीतेचे कलम ३७६, ३७६(२)(जे)(एन), ३७६(३) आणि बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियमाचे कलम ४ अन्वये शिक्षा असलेल्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे बंधपत्र व जामीन रद्द करण्यात येते.

३) जप्त करण्यात आलेला मुद्देमालाचा अपिल कालावधी नंतर नाश करण्यात यावा.

४) न्यायालयाच्या सदरच्या न्यायनिर्णयाविरुद्ध अपील दाखल झाल्यास जेव्हा केव्हा उच्च न्यायालय नोटीस देईल, तेव्हा न्यायालयासमोर उपस्थित राहण्याकरीता आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहीतेच्या कलम ४३७-अ (भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१) प्रमाणे रक्कम ₹१५,०००/- चे बंधपत्रासह जमानतपत्र द्यावयाचे आहे. सदरच्या जमानतपत्राचा अंमल सहा महिन्यांकरीता राहील.

५) फौजदारी प्रक्रीया संहीतेच्या कलम ३६५ (भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४०६) अन्वये सदर न्यायनिर्णयाची प्रत जिल्हा दंडाधिकारी, गडचिरोली यांना पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by ROHAN BALKRISHNA REHPADE
Date: 2026.04.02 17:28:28 +0530

अहेरी.
दिनांक - ०२/०४/२०२६.

(**रोहन बा. रेहपाडे**)
विशेष न्यायाधीश (पोक्सो कायदा)
अहेरी.

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथन करते की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव :- अतिरिक्त सत्र न्यायालय, अहेरी.

लघुखेकाचे (श्रेणी-२) नांव :- श्री. जे.एन. सावरकर.